ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक :– १०.०५.२०२४

# प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक उत्तम रतनाराव डाखुरे, वय ५५ वर्ष, व्यवसाय नौकरी, पद– मंडळ अधिकारी, वर्ग–३, रा. गंगानगर, कारवाडी, ता.जि.हिंगोली यांनी २०,०००/–रू. लाचेची मागणी करून दिनांक ०९.०५.२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान २०,०००/– रू लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे हिंगोली शहर, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल झाला आहे.**

---

दिनांक ०८.०५.२०२४ रोजी यातील तक्रार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांची पत्नी सौ. जिजाबाई विठ्ठलराव शिंदे हिचे नावे हिवरा जाटु शेत शिवारात गट क्र.१६० मध्ये १ एकर ११ आर शेत जमीन देउबाई मधुकर काशीदे यांच्याकडुन सन २०११ मध्ये खरेदी केली होती त्यावेळी शेतीच्या सात बाऱ्यावर त्यांच्या पत्नीच्या नावे फेरफार नोंदविण्यात आला होता.

या जमीनीचे खरेदीबाबत देउबाई काशीदे यांनी तक्रारदार यांच्याविरूध्द सन २०१८ मध्ये सावकारी कार्यालय,औंढा येथे तक्रार केली होती.त्यामध्ये तक्रारदार यांचे बाजुने निकाल लागल्याने देउबाई काशीदे यांनी हिंगोली येथे तक्रार केली होती त्यामध्ये तक्रारदाराच्या विरूध्द निकाल लागला होता. तक्रारदार यांनी निकालाच्या विरूध्द महानिबंधक कार्यालय,औरंगाबाद व पुणे यांच्याकडे अपिल केले आहे तसेच दिवाणी न्यायालय औंढा ना. येथे दिवाणी दावा सुरू आहे.

आरोपी लोकसेवक उत्तम रतनराव डाखुरे, मंडळ अधिकारी मंडळ येहळेगांव सोळंके, ता.औंढा ना. यांनी तक्रारदाराच्या पत्नीच्या नांवे असलेली सातबारा उताऱ्यावरील फेरफार नोंद देउबाई काशीदे यांचे नांवे न करता तकारदार यांचे पत्नीचेच नावे कायम ठेवण्यासाठी तक्रारदार यांचेकडे खर्च मागत असले ते मागत असलेला खर्च हि लाच असल्याची तक्रारदार यांची खात्री झाल्याने त्यांचेवर कारयदेशीर कारवाई करावी म्हणून तक्रारदाराने तक्रार दिली होती. त्यानंतर तक्रादार यांचे तक्रारीची दि.०९.०५.२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता मंडळ अधिकारी उत्तम डाखुरे यांनी पंचासमक्ष २०,०००/– रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाल्याने दि.०९.०५.२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचा समक्ष मंडळ अधिकारी उत्तम डाखुरे यांनी २०,०००/– रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून लोकसेवक उत्तम रतनाराव डाखुरे, वय ५५ वर्ष, व्यवसाय नौकरी, पद– मंडळ अधिकारी, वर्ग–३, रा. गंगानगर, कारवाडी, ता.जि.हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु.र.नं.३०२/२०२४ क. ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांचे मार्गदर्शना खाली, श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोहेकॉ श्री तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींग,राजाराम फुपाटे, भगवान मंडलीक, शिवाजी वाघ अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**डॉ. राजकुमार शिंदे. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९६२३९९९९४४**
**श्री. अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८७०२२१३७९**
**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५**

**अनिल ब. कटके**
**पोलीस उप अधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.**

CamScanner